# संपादकीय

## प्रादेशिक पर्यायाचा प्रभाव!

पुढील वर्षी 2026 साली या घटनेची सत्तरी साजरी करता येईल. तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांच्या मराठी-द्वेष्ट्या धोरणाविरोधात महाराष्ट्रात पहिला हुंकार उमटला आणि त्याचे रूपांतर 1956 साली संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेत झाले. स्वातंत्र्यापूर्वी भाषिक राज्य रचनेचा पुरस्कार करणाऱ्या नेहरू-पटेल यांनी नंतर भूमिका बदलली. त्यामुळे मराठी भाषकांसाठी स्वतंत्र राज्यनिर्मितीची शक्यता दुरावली. हे महाराष्ट्रावर अन्याय करणारे होते. त्या विरोधात साम्यवादी भाई अमृत डांगे यांच्यापासून ते नेहरू मंत्रिमंडळातील चिंतामण द्वारकानाथ ऊर्फ सीडी देशमुख, केशव सीताराम ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे, श्रीधर माधव ऊर्फ एसएम जोशी, अण्णा भाऊ साठे, प्रल्हाद केशव ऊर्फ आचार्य अत्रे आदी उभे राहिले आणि पाहता पाहता संयुक्त महाराष्ट्रासाठी प्रखर आंदोलन उभे राहिले. ते पक्षातीत होते. त्यास यश येऊन चार वर्षांनी महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्या घटनेची सप्तदशकपूर्ती जवळ येत असताना पुन्हा एकदा मराठी भाषेच्या मुद्द्यावर महाराष्ट्रात सर्वपक्षीय आंदोलन उभे राहताना दिसते. त्यावर भाष्य करण्याआधी या दोन घटनांतील साम्य आणि भिन्न घटकांचा उल्लेख आवश्यक.या दोहोंतील साम्याचे दोन अत्यंत प्रमुख मुद्दे. एक म्हणजे तेव्हाप्रमाणेच आताही सर्वशक्तिमान, प्रबळ असलेले केंद्र सरकार. त्या वेळी केंद्राकडून संघराज्यीय भावनांची पायमल्ली होत असल्याचा आरोप झाला आणि आताही तेच सुरु आहे. तेलुगू भाषक पोट्टी श्रीरामलु यांनी यास पहिल्यांदा आव्हान दिले आणि आंध्र प्रदेशची निर्मिती झाली. आजही केंद्राच्या संघराज्यीय दमन कृतीविरोधात दक्षिणी राज्येच प्राधान्याने उभी ठाकलेली दिसतात. यापेक्षाही महत्त्वाचा दुसरा समान मुद्दा म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. तत्कालीन सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर ऊर्फ गुरुजी यांनी नेहरू-पटेल यांची त्या वेळी उघडपणे पाठराखण केली आणि आताही काही वेगळे होते आहे असे नाही. रास्व संघाचा भाषाधारित राज्य पुनर्रचनेस विरोध होता. आज या भूमिकेत बदल झाला असल्याचा दावा संघ स्वयंसेवकही करणार नाहीत. याच विचारधारेच्या आधारे जन्मास आलेला विद्यमान सत्ताधारी भारतीय जनता पक्ष मराठी शाळांत आता हिंदी भाषा लादू पाहतो त्यामागील पूर्वसूत्र हे. आता काही भेदघटकांविषयी. त्या वेळी मराठी आणि महाराष्ट्राच्या पुरस्कारासाठी पं. नेहरू यांच्या मंत्रिमंडळातून राजीनामा देण्याची हिंमत दाखवणारे सीडी देशमुख सद्या:स्थितीत अशक्य. केंद्रीय मंत्रिमंडळातील एकही मायेचा पूत आज महाराष्ट्राच्या मागे उभे राहण्यास धजावणार नाही. त्या वेळी राजीनाम्यानंतरही पं. नेहरू आणि सीडी यांचे संबंध सौहार्दाचेच राहिले. असे काही अपेक्षिणेही सद्या:स्थितीत अशक्य. भेदाचा दुसरा मुद्दा म्हणजे शिवसेना नामे पक्षाची उडालेली शकले. केंद्रातील बलदंड नेतृत्वाच्या कृपेने शिवसेना हा पक्ष कायदेशीरदृष्ट्या एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली असला तरी राजकीयदृष्ट्या तो भाजपांकित आहे. त्यामुळे राज्यासाठी तो भाजप-विरोधात काही भूमिका घेण्याचे धाडस करेल, हे असंभव. तीच बाब अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची. केंद्रीय यंत्रणांचा भयकारी ससेमिरा टाळण्यासाठी तेही भाजपवासी झाले आणि त्यामुळे त्यांची राष्ट्रवादी 'खरी' ठरवली गेली. परंतु शिंदे यांची सेना काय वा अजित पवारांची राष्ट्रवादी काय! हे दोन पक्ष टिकणे ही केंद्रीय सत्ताधारी भाजपची गरज! ती आहे तोपर्यंत त्यांचे अस्तित्व राहणार. तेव्हा हे दोन 'अधिकृत' पक्ष राज्याच्या हितासाठी भाजपस विरोध करणे अशक्य. यातील तिसरा आणि अत्यंत संयुक्तिक मुद्दा म्हणजे 'संयुक्त महाराष्ट्र समिती'चे अ-राजकीय असणे. त्या समितीत जरी सर्वपक्षीय होते तरी समितीचा चेहरा राजकीय नव्हता. आताही हिंदीच्या मुद्द्यावर तसाच प्रयत्न संबंधितांचा दिसतो. त्यास किती यश येते ते दिसेल. त्या वेळेस हे सर्व पक्ष/नेते हे काँग्रेसच्या विरोधात होते. आताही तसे करू पाहणारे हे भाजपच्या विरोधात असले तरी त्यांचे वर्णन भाजप-विरोधी असे करण्यापेक्षा त्या सर्वांस भाजप-बाधित संबोधणे अधिक रास्त. त्यातही उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे दोन पक्ष विशेष भाजप-बाधित. या सर्व पार्श्वभूमीचा अर्थ काय?मराठी माणूस प्रामाणिक प्रादेशिक पर्यायापासून या साठ वर्षांत किती वंचित राहिला याचे विदारक चित्र 'तेव्हा' आणि 'आता' या तुलनेतून समोर येते. भारतासारख्या अक्राळ-विक्राळ राज्यात प्रादेशिक अस्मिता असाव्यात की देशाची स्वतंत्र अशी राष्ट्रीय अस्मिता निर्माण व्हावी हा केवळ विद्वानांतील चर्चेचा विषय नाही. 'विविधतेतून एकता' हे भारताचे वास्तव होते. तूर्त आहेदेखील. तथापि 'एक देश, एक धर्म, एक भाषा' या मानसिकतेतून निर्माण झालेल्या सशक्त राजकीय प्रवाहात ते टिकून राहील किंवा कसे हा खरा यातील प्रश्न. गेल्या दहा वर्षांतील राजकारणाने या प्रश्नांची तीव्रता सर्वांस जाणवू लागली आणि हिंदी भाषेची सक्ती हे निमित्त ठरून या विरोधात व्यक्त होण्याची गरज राजकीय पक्षांत निर्माण झाली. आज हिंदीच्या मुद्द्यावर राज्यातील भाजपेतर पक्ष एकत्र येताना दिसले ते यामुळे. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आंदोलनाप्रमाणे आताही त्यात साम्यवाद्यांचा सहभाग दिसला आणि काँग्रेस वा त्याच विचारधारेतून निर्माण झालेला शरद पवार यांचा राष्ट्रवादीही या विरोधाचा घटक झाला. तथापि दरम्यानच्या काळात सत्तेच्या मोहापायी यांतील अनेकांस मराठीचा विसर पडला आणि हिंदी पुरस्कर्त्या भाजपशी त्यांनी पाट लावला. भाजप 'गरज सरो; वैद्या मरो' या तत्त्वाने(च) चालतो. त्यांची गरज संपली म्हणून या पक्षांस मराठीचा मुद्दा घेण्याची गरज वाटली. भाषाकारणापेक्षा, प्रादेशिक अस्मितेपेक्षा राजकारणास प्राधान्य दिले की असे होते. अर्थात जे घडले ते काही आगळे नाही. जम्मू-काश्मिरात ज्या 'पीडीपी'स थेट राष्ट्रद्रोही ठरवले गेले त्याच पक्षाशी भाजपने सत्ताशय्या सजवल्याचा इतिहास ताजा. तेव्हा महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी काही अक्षम्य पाप केले असे मानण्याचे कारण नाही. पूर्वपीठिका काहीही असो, या पक्षांस महाराष्ट्रकारणाचे महत्त्व लक्षात आले याचे स्वागतच.ते करताना केवळ मोर्चाच्या निमित्ताने दोन ठाकरे, एक पवार यांनी एकत्र येण्याचा अर्थ त्यांच्या राजकीय युतीपर्यंत नेणे हा राजकीय हुच्चपणाच ठरतो. तो चॅनेलीय चर्चांत ठीक. तूर्त या प्रादेशिक पर्यायाच्या प्रभावाकडे सावधपणेच पाहिलेले बरे.तो प्रभाव प्रत्यक्ष पर्याय उभा राहाण्याआधीच दिसणे, हे वाटते तितके अनपेक्षित नाही. केंद्र आणि महाराष्ट्रातील सत्ताधारी भाजप हे प्रयत्न यशस्वी कसे होणार नाहीत त्याची योग्य ती खबरदारी घेईल, हे निश्चित होते. मराठी अस्मितेचा असा जागर भाजपस परवडणारा नाही. त्या पक्षाच्या अल्प आणि दीर्घकालीन राजकारणासाठी ते अयोग्यच. तेव्हा सध्याची ही मराठी जागृती कशी बारगळेल याचा प्रयत्न होणार हे उघड होते. त्यासाठीचा साधा उपाय म्हणजे पाच जुलै रोजी होऊ घातलेला सर्वपक्षीय मोर्चा निघण्याआधीच हिंदी सक्तीच्या निर्णयास स्थगिती देणे! हा उपाय आज ना उद्या करावाच लागणार, हे उघड होते. तो सत्वर करण्याचे राजकीय चातुर्य देवेंद्र फडणवीस यांनी दाखवले. तसे त्यांनी केले नसते तर मराठीच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय, सर्व-जातीय आणि अर्थातच सर्व-धर्मीय एकीचे दर्शन घडवण्याची संधी विरोधकांस

# भाषिक सहिष्णुतेचा संकोच: सरकारी निर्णयांचा दिखाऊपणा

**डॉ. भारत कऱ्हाड**

महाराष्ट्र ही संतांची, साहित्यिकांची आणि विचारवंतांची भूमी. इथे छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्म, भाषा, जातपात यांच्या पलीकडे जाऊन 'स्वराज्य' उभं केलं. पुढे ज्ञानेश्वर, तुकाराम, फुले, आगरकर, गांधी आणि पु. ल. देशपांडे यांनी माणसं जोडणाऱ्या भाषेचा खरा संदेश दिला. पण आज महाराष्ट्रात भाषा माणसं जोडण्याऐवजी माणसं तोडण्यासाठी वापरली जात आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी सरकारकडून मागील काही वर्षांत अनेक शासकीय निर्णय घेतले गेले. सर्व दुकानांवर मराठी फलक बंधनकारक करणे, मराठी विषय सक्तीचा करणे, सरकारी व्यवहार मराठीत करण्याचे आदेश देणे, मराठी दिवस साजरा करणे, मराठीतून व्यावसायिक शिक्षण सुरु करणे अशा विविध घोषणांची मालिका सुरु आहे. वरवर हे पाहता छान वाटते, पण प्रत्यक्षात किती अंमलबजावणी होते, हे पाहिलं की चित्र वेगळंच दिसतं.

मुंबई महापालिकेच्या 2023 च्या पाहणीत स्पष्ट झाले की मुंबईतील केवळ 47% दुकानांवर मराठी फलक योग्य स्वरूपात आहेत. राज्यातील 85% शासकीय कागदपत्रे आजही इंग्रजीत तयार होतात. न्यायालयीन कामकाज 95% इंग्रजीत चालते, मराठीचा वापर फारच नगण्य आहे. मराठीतून इंजिनिअरिंग व वैद्यकीय शिक्षण सुरु झाल्याचे जाहीर केलं, पण 70% विद्यार्थ्यांना त्या अनुषंगाने दर्जेदार पुस्तके उपलब्ध नाहीत, हे वास्तव आहे. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीत सामग्री पुरेशा प्रमाणात मिळत नाही, हेही अनेक विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले आहे.

सरकार मराठीच्या नावाखाली नियम बनवते, पण प्रत्यक्षात सरकारी कार्यालये इंग्रजीतूनच चालतात, न्यायालये इंग्रजीतूनच काम करतात आणि महत्त्वाचे निर्णय इंग्रजीतच मांडले जातात. याचा अर्थ मराठीची रक्षा करायची फक्त फलकांवर, पण व्यवहारात इंग्रजीलाच मान द्यायचा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार मातृभाषेत शिक्षण देण्यावर भर देण्यात



आला आहे. महाराष्ट्रानेही मराठीतून व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचे स्वागतार्ह पाऊल उचलले आहे, पण प्रत्यक्षात त्या अभ्यासक्रमांसाठी न पुस्तके उपलब्ध आहेत, न प्रशिक्षित शिक्षक आहेत. मराठीत उच्चशिक्षण देण्याचे फक्त घोषणा झाल्या आहेत, पण आवश्यक साधनसंपत्तीवर काम अजून फार कमी आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात मराठी अजूनही केवळ नावापुरती आहे.

भाषेच्या नावावर राजकीय पक्षांनी आंदोलनं उभी केली आहेत. काही पक्ष म्हणतात की मुंबई मराठी माणसाची राहिली पाहिजे, काही म्हणतात की मराठी फलक न लावणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. पण हेच पक्ष इंग्रजी शाळांमध्ये आपली मुलं घालतात, स्वतःच्या पक्षाची वेबसाइट इंग्रजीत ठेवतात आणि प्रचारासाठी इंग्रजी-हिंदी वापरतात. मग खरंच हे भाषाप्रेम आहे का, की फक्त मतांसाठीचा अजेंडा?

जर खरंच मराठी वाचवायची असेल तर मराठी व्यवहारात आणली पाहिजे. सर्व शासकीय व्यवहार मराठीत झाले पाहिजेत, न्यायालयीन प्रक्रिया मराठीत उपलब्ध झाली पाहिजे, व्यावसायिक शिक्षणासाठी दर्जेदार मराठी पुस्तके तयार झाली पाहिजेत, स्पर्धा परीक्षा मराठीत सहज उपलब्ध झाली पाहिजे. शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करणे म्हणजे भाषेवर प्रेम नाही. त्या विषयाची गुणवत्ता वाढवली पाहिजे. सरकारने फक्त आदेश काढण्यापेक्षा अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

सामान्य माणसाने आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर केला पाहिजे. सोशल मीडियावर मराठी वाढवली पाहिजे. मुलांमध्ये मराठी वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मराठीचा अभिमान बाळगताना हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तेलुगू यांसारख्या इतर भाषांचा द्वेष करणे थांबवले पाहिजे. कारण भाषा ही माणसं जोडते, माणसं तोडण्यासाठी वापरायची नसते.

आज महाराष्ट्राला भाषिक अभिमान हवा आहे, पण तो भाषिक सहिष्णुतेच्या आधारावर हवा आहे. पु. ल. देशपांडे यांचे वाक्य आपण कायम लक्षात ठेवायला हवे – "जी व्यक्ती आपल्या भाषेवर प्रेम करते, ती इतर कुणाच्याही भाषेचा द्वेष करु शकत नाही." मराठीला वाचवायचं असेल तर ती मनात असली पाहिजे, व्यवहारात असली पाहिजे आणि शिक्षणात असली पाहिजे. फक्त फलकांवर नाही.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# भीक मागणाऱ्या महिला व तिच्या लहान मुलीला बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात दिला आसरा.




## प्रमिलाताई माळी ओतारी यांची माणुसकीची भावना

वडवणी प्रतिनिधी

भीक मागत असलेल्या एका महिला व तिच्या लहान मुलीला सामाजिक कार्यकर्त्या शिवसेनेच्या नेत्या प्रमिलाताई माळी ओतारी यांनी बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात सुरक्षित आसरा दिला. राजकारणाबरोबर सामाजकारण .

दिनांक 23 जुन रोजी वडवणी शहरात गेले अनेक दिवसापासून एक महिला व तिची लहान मुलगी भीक मागत फिरत असत म्हणून त्यांना बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात सुरक्षित राहावं यासाठी प्रमिलाताई माळी यांनी या बेघर केंद्रामध्ये आणून सोडले.हिच दिव्यांग महिला व तिची लहान मुलगी गेल्या पाच वर्षापूर्वी वडवणीत महादेव मंदिरा कडे रात्री घेऊन बसली होती.कोणी तरी येऊन मला सांगितले की एक दिव्यांग महिला व छोट बाळ घेऊन बसली आहे.रात्रीची वेळ आसल्याने त्या बाळाला कुत्रे मांजरे खातील म्हणून मी लगेच गेले व घरी आनले आणि तिची विचारपूस केली व पोलिस टेन्शन मार्फत तिला तिच्या घरी नाळवंडी येथे सोडले. पुन्हा काही वर्षाने तिला कोणी तरी वडवणीत आनुन सोडले.आणि पुन्हा वडवणीत भीक मागून खात राहीली आज मुलगी पाच वर्षाची झाली. महिला व मुलीकडं पाहून वाईट वाटायचे.मी विचार न करता बीड येथे जिव्हाळा बेघर निवारा केंद्र राजू वंजारे सर यांना फोन लावला व परिस्थिती सांगितली व मी लगेच रिक्षा केला.बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात सुरक्षित सोडले.मायलेकी खुप खुश झाल्या. बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अनेक बेघर झालेले लोक आहेत.या संस्थेला शासनाचे अनुदान नसतांनाही या ठिकाणी अनेकांना आसरा मिळत आहे.यावेळी उपस्थित बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजित वैद्य सर,व्यवस्थापक राजू वंजारे सर,काळजीवाहक छाया सरोदे , शिवसेना वडवणी ता.संघटीका कौशल्या कदम, शशिकला आवचर, किर्ती पारीक आणि मी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट शिवसेना बीड जिल्हाप्रमुख महिला आघाडी बेघर निवारा केंद्राचे मनापासून आभार व्यक्त केले.

# महात्मा गांधी महाविद्यालयात वसंतरावजी नाईक जयंती साजरी



अहमदपूर प्रतिनिधी:- अहमदपूर येथील विचार मंडळाचे महात्मा गांधी महाविद्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी स्वर्गीय मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी विचार विकास मंडळाचे सहसचिव सुरेश सुरेश रावजी देशमुख महाविद्यालयाचे इन्चार्ज प्राचार्य प्रोफेसर डॉक्टर त्र्यंबकराव देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्प अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर जे पी कुलकर्णी, अधीक्षक श्री डी के गाजरे, माजी प्राचार्य डॉक्टर अनिता शिंदे, डॉक्टर राजश्री जाधव ,श्री केनचे, प्राध्यापक मनोज रेड्डी, पर्यवेक्षक ए एन शिंदे, श्री सुधाकर कदम, श्री करंजे, श्री धुळगुंडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहून अभिवादन केले.

# गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी खाजगी कोचिंग क्लासेस समोर तक्रार निवारण पेटी बसवा

## पोलीस निरीक्षकांना सामाजिक कार्यकर्ते भीमसेन लोमटे व अशोक गंडले यांचे निवेदन



अंबाजोगाई (प्रतिनिधी) गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी खाजगी कोचिंग क्लासेस समोर तक्रार निवारण पेटी बसवा अशी मागणी भीमसेन लोमटे व अशोक गंडले यांनी पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांना मंगळवारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

सध्या बीड जिल्ह्यात खासगी कोचिंग क्लासेसचा विषय वाढत्या गैरप्रकारांनी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. याबाबत अंबाजोगाई येथील सामाजिक कार्यकर्ते भीमसेन (अप्पा) दाजीसाहेब लोमटे व अशोक (भाऊ) गंडले यांनी पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांना मंगळवार, दिनांक 1 जुलै रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खाजगी शिकवणी वर्गातील मुला-मुलींची संख्या लक्षणीय वाढलेली आहे व या अनुषंगाने गैरप्रकारांत वाढ झालेली आहे. सामाजिक भीती पोटी अन्यायग्रस्त मुले व मुली निमूटपणे सहन करतात. हे मागील काही दिवसांपासून समोर आलेल्या घटनेवरून अधोरेखित होते आहे. अशा घटनांना व अन्यायाला आळा बसविण्यासाठी आपण प्रत्येक खाजगी क्लासेस चालकांना बंद तक्रार पेटी बसविण्यास सक्तीचे करावे व सदरील तक्रार पेटीची दर 8 दिवसांनी आपल्या कार्यालयामार्फत तपासणी करण्यात यावी, जेणे करून भविष्यात घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा बसेल, कोचिंग कक्लासेसचे सी.सी.टी.व्ही फुटेज वेळोवेळी पोलिसांकडून चेक करण्यात यावेत, व तेथे पोलीस गस्त वाढविण्यात यावी जेणे करून मारामारी, छेडखानी अशा घटनांना आळा बसेल. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भीमसेन लोमटे व अशोक गंडले यांनी सदरील निवेदनातून केली आहे. या निवेदनावर भीमसेन (अप्पा) दाजीसाहेब लोमटे, अशोक (भाऊ) गंडले, श्रीकांत कदम यांची स्वाक्षरी आहे. निवेदन देताना बुध्दकरण जोगदंड, शिंगणकर सर, महेश मगर, अनिल जोगदंड, प्रल्हाद उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# कोकणातील विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेत पुढे यावे – डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आवाहन



दापोली (प्रतिनिधी) "कोकणातील विद्यार्थी केवळ दहावी व बारावीच्या परीक्षांमध्येच पुढे असू नयेत, तर प्रशासकीय सेवांमध्येही मोठ्या प्रमाणावर यश मिळवले पाहिजे. कोकणाचा विद्यार्थी हा अधिकारी म्हणून ओळखला गेला पाहिजे," असे स्पष्ट आणि आत्मीय आवाहन दापोलीचे प्रांताधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. ते वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोलीच्या 51 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना डॉ. सूर्यवंशी म्हणाले, "कोकणातील विद्यार्थी दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये सतत राज्यात अग्रस्थानी असतात, मात्र स्पर्धा परीक्षा, विशेषतः MPSC आणि UPSC मध्ये त्यांचे प्रमाण कमी आहे. ही कमतरता भरून काढण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहावे. प्रशासकीय सेवा हा समाज परिवर्तनाचा प्रभावी मार्ग आहे आणि त्या क्षेत्रात कोकणातील विद्यार्थ्यांनी यश मिळवावे."

"Determination, Devotion, Discipline आणि Dedication ही यशाची चार सूत्रे आहेत. कोणतेही करिअर निवडताना या तत्वांचा आग्रह ठेवा आणि आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकून निर्णय घ्या. तुम्ही जे कराल, त्यात उत्कृष्ट बना," असा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. तसेच, महाविद्यालयात सुरु होणाऱ्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यवाह डॉ. दशरथ भोसले होते. डॉ. भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच्या 51 वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. "मी या महाविद्यालयाचा पहिला विद्यार्थी आहे आणि आज वर्धापन दिनाचा अध्यक्ष आहे, ही माझ्यासाठी आयुष्यातील मोठी संधी आहे," असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचून दापोलीचे नाव उज्ज्वल करण्याचा सल्ला दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कराड यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सादर केला. "हे महाविद्यालय देणगी न घेता प्रवेश देणारे या परिसरातील एकमेव शिक्षण संस्था आहे. आम्ही B+ ग्रेड प्राप्त केली असून, आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे," अशी माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक श्री. रामचंद्र बेलोसे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली. नंतर वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. मुख्य सभागृहात झालेल्या सन्मान समारंभात 1974, 1975 आणि 1976 च्या माजी विद्यार्थ्यांसह तत्कालीन संचालकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सदस्य श्री विजय दळवी, प्रा. हरिप्रसाद नड्डा आणि संचालक सुनीता बेलोसे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात संस्थेचे सभापती श्री. प्रियदर्शन बेलोसे, संचालक श्री. सुनील चव्हाण, श्री. दीपक हर्डीकर, नगरसेवक विलास शिगवण, माजी संचालक श्री. विजय दळवी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे प्रमुख श्री. धनंजय यादव यांनी वर्धापन दिनासाठी शुभेच्छा पाठवल्या होत्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. बाळासाहेब गुंजाळ आणि समृद्धी खताते यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ. सुरेश निंबाळकर यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

हॅलो बीड संघर्षनेता

बुधवार दि. 02 जुलै 2025



# रेड झोनमधील उद्योगांनी प्रदूषणाचे नियम न पाळल्यास कारवाई – मंत्री पंकजा मुंडे



मुंबई, दि. 1 : रेड झोनमध्ये असलेल्या उद्योगांना स्वतंत्र धोरणानुसार परवानग्या दिल्या जात असून त्यांची कार्यपद्धत, जबाबदाऱ्या आणि उपाययोजना वेगळ्या असतात. मात्र, त्यांनाही प्रदूषण नियंत्रणाचे निकष लागूच असतात. त्यामुळे रेड झोनमधील उद्योगांकडूनही नियमभंग झाल्यास कारवाई केली जात असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले.

सदस्य अतुल भातखळकर यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य वरुण सरदेसाई, मनीषा चौधरी आणि जितेंद्र आव्हाड यांनी सहभाग घेतला.

मंत्री मुंडे यांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत व्यापक प्रमाणात कारवाई केली जात आहे. प्रदूषणाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांना नोटीस बजावण्यात येत असून राज्यात 331 उद्योगांना नोटीस देण्यात आल्या आहेत, तर 304 उद्योगांना अंतरिम आदेश देण्यात आले आहेत. तसेच प्रदूषणाचे नियम न पाळणाऱ्या 318 उत्पादकांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनानाही योग्य प्रकारे कचरा व्यवस्थापन, सांडपाणी निचरा याबाबत कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. प्रदूषण संदर्भात नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जात आहेत. आशा प्राप्त तक्रारी संबधित अधिकाऱ्यांना पाठवून याबाबत कारवाई केली जात आहे. तसेच उद्योगांकडून होणाऱ्या सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया होत आहे की नाही, यावर लक्ष केंद्रित केले असून याबाबतही संबंधित उद्योगांना आदेश देण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# औष्णिक विद्युत केंद्रात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



परळी /प्रतिनिधी औष्णिक विद्युत केंद्रात दि 1 जुलै रोजी हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता कुंदन राठोड हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कामगार नेते सोपान चौधर यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन केले. समारोप करताना कुंदन राठोड म्हणाले की, नाईक साहेबांच्या कार्यकाळात कृषी धोरण प्रभावीपणे राबविण्यात आले होते. यावेळी महानिर्मितीचे सुरक्षा अधिकारी वरिष्ठ व्यवस्थापक बी आर अंबड ,जायभाये, सोपान चौधर, बालाजी पवार, विनोद राठोड, आदिची उपस्थिति होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यानी केले तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण पान 3 वर

## बीड जिल्हा अन्याय, अत्याचारग्रस्त म्हणून घोषीत करा - अनिल तुरुकमारे





बीड प्रतिनिधी - बीड जिल्ह्यात नवनीत कावत हे पोलीस अधिक्षक म्हणुन पदभार घेतल्या पासुन आज पर्यंत बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन महिला वरील अन्याय अत्याचारात वाढ झालेली आहे. पोलीस अधिक्षक हे पोलीस अधिक्षक कार्यालयात बसुन फक्त आदेश देण्याचे काम करीत आहेत, अनुचीत प्रकार घडल्यास ते तात्काळ भेट देत नाहीत त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत चालली आहे. अनुसुचित जाती जमाती मधील महिला यांच्यावर मारहाणीचे प्रकार, विनयभंगाचे प्रकार, जातीवाचक शिवीगाळीचे प्रकार घडले आहेत गुन्हा दाखल होऊन ही या पान 3 वर

## संघर्षभूमीवर व्हि जे आरक यांना विनम्र अभिवादन



अंबाजोगाई (प्रतिनिधी) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी व तत्कालीन बीड जिल्हा शेड्युल्डकास्ट फेडरेशनचे अध्यक्ष व्हि जे आरक साहेब यांची 107 वी जयंती संघर्षभूमीवर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. व्हि जे आरक प्रेरणास्तंभ परिसरात सकाळी पुष्पा अभिवादन व सायंकाळी विचार अभिवादन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विचारा अभिवादन कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व व्हि जे आरक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर सामूहिक वंदना घेण्यात आली.

याप्रसंगी ' व्हि जे आरक यांचे जीवन आणि कार्य व आजचे कार्यकर्ते ' या विषयावर चर्चा संपन्न झाली. या चर्चेत संजय हतागळे , विश्वनाथ सावंत , बाबुभाऊ कांबळे , मिलींद पान 3 वर

# वसंतराव नाईक हे हरित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करणारा नेता-दीपक तांदळे

### संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



परळी (प्रतिनिधि) :- शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा विद्यानगर विभागात वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री. कैलासजी तांदळे साहेब (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था) तर प्रमुख पाहुणे मा. श्री. दीपकजी तांदळे साहेब ( सचिव, पद्मावती शिक्षण संस्था ) , प्र. मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर व अनकाडे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसंतराव नाईक व शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव श्री. दीपकजी तांदळे सर यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की," वसंतराव फुलसिंग नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी व राजनितीज्ञ होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान होते. नाईक यांचा जन्म पुसद जवळील गहुली या छोट्याशा खेड्यातील एका सधन शेतकरी कुटुंबात 1 जुलै 1913 रोजी झाला. वसंतराव नाईक हरितक्रांती , पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात.माजी राष्ट्रपती, भारतरत्न प्रणव मुखर्जी यांनी "वसंतराव नाईक हे भारत पान 3 वर

### टि.सी.हरवली आहे

मिना साधू शिंदे, या नावाची इयत्ता नववी मध्ये वार्षिक परिक्षेत गैरहजर शेरा असलेली टि.सी. परळी ते पुणे बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. जर कोणाला आढळली असल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क:- मिना साधू शिंदे.**
मिलिंद नगर, परळी-वै.
मो. 9511987948,
9822540547.

# विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून राहुल घोबाळे यांचे कार्य कौतुकास्पद; नितीन समशेट्टे



परळी वैजनाथ विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून राहुल घोबाळे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन भाजपा नेते नितीन समशेट्टे यांनी विरा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात केले.

सामाजिक कार्याचा वसा घेऊन मागील तीन वर्षापूर्वी राहुल घोबाळे यांनी विरा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा 4 था वर्धापन दिन मंगळवार, 1 जुलै रोजी साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद शाळेत या निमित्ताने विद्यार्थांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी 200 विद्यार्थ्यांना वही, पेन, दप्तर सह शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना भाजपा नेते नितीन समशेट्टे यांनी राहुल घोबाळे यांच्या विविध सामाजिक कार्याची कौतुक केले. विरा फाउंडेशन च्या माध्यमातून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा, क्रिकेट स्पर्धा, गरजूंना विविध माध्यमातून मदत अश्या विविध सामाजिक कार्याची दखल घेण्यात येईल व हे कार्य अनेकांना प्रोत्साहित करेल असे गौरवोद्गार यावेळी काढले.

यावेळी जेष्ठ रिपाई नेते आर एच आण्णा व्हावळे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते माधव ताटे, जेष्ठ नेते

# असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेची राज्य कार्यकारिणी जाहीर

### मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी आत्मलिंग शेटे यांची निवड



पुणे (प्रतिनिधी):- असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आप्पासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य संघटनेची राज्य कार्यकारिणी (2025-26) जाहीर करण्यात आली. या राज्य कार्यकारणी मधील पदाधिकारी व सदस्य पुढील प्रमाणे.

राज्य उपाध्यक्ष- गोरख तावरे कराड सातारा, भिका तुकडू चौधरी जळगाव, राज्यसचिव-सुभाष लहाने बुलढाणा, राज्य संघटक- सुमित सुनीलराव कुलकर्णी श्रीरामपूर, महिला आघाडी प्रमुख-सौ तेजस्विनी सूर्यवंशी सांगली, संघटन सचिव-नेताजी मेश्राम गडचिरोली, सहसचिव- हेमंतू देसाई धर्माबाद नांदेड, संघटन सहसचिव- भीमराव ऊल्हारे अहिल्यानगर, राज्य कार्यकारिणी सदस्य-सौ.सुमन लक्ष्मण वाकडे परळी वैजनाथ, भगवान नागोराव शहाणे छत्रपती संभाजीनगर, रवींद्र वाघ बुलढाणा, सौ शोभा जयपुरकर, नागपूर, ओम प्रकाश शिंदे, जालना, मराठवाडा विभागीय अध्यक्ष- छत्रपती संभाजीनगर : पान 3 वर

# परळी पंचायत समिती समोर बांधकाम कामगारांचे यशस्वी आंदोलन-प्रा. खाडे बी. जी.

**» परळी वैजनाथ,प्रतिनिधी...बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेच्या वतिने**




नागापूर येथील बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी मागील वर्षी 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्या या मागणीसाठी 30 जून रोजी धरणे आंदोलन केले. नागापूर येथील 25 बांधकाम कामगारांनी धरणे आंदोलनात सहभाग घेतला. परळी शहरातील बांधकाम कामगार मोठ्या प्रमाणात समर्थनासाठी हजर राहिले.

पंचायत समिती परिसरात घोषणा देवून परिसर दणाणून सोडला. प्रा. बी.जी.खाडे, प्रभाकर नागरगोजे व कॉ. जालिंदर गिरी यांचे प्रतिनिधी मंडळ बी डी.ओ. केंद्रे यांना भेटून चर्चा केली. परळी तालुक्यातील 1500 बांधकाम कामगाराची सरकारी कामगार अधिकाऱ्याने दिलेली नोंदी व कामगाराची 1 आगस्ट ते 23 जून पर्यंतची यादी पान 3 वर

# जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी यांच्या मनमानी विरोधात*जिल्हाधिकारी कार्यालय समोर तिव्र आंदोलन




बीड (प्रतिनिधी) नगर विकास विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी तथा प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत यांचा मनमानी कारभाराच्या विरोधात व कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित समस्यांबाबत रोजंदारी मजदुर सेनेच्या वतीने भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वात सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे, निदर्शने आंदोलन केले. बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद/नगरपंचायत कंत्राटी कामगारांची अनेक मूलभूत प्रश्न खोळंबली आहेत, त्यांची बेकायदेशीरपणे पिळवणूक सुरु आहे. या धोरणाविरुद्ध कामगार नेते तथा रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी व जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांनी नगरपरिषद/ पान 3 वर

## हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त नगर परिषद कार्यालयात अभिवादन



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- राज्यातील हरित क्रांतीचे जनक आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जयंतीदिनी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस नगर परिषदचे उपमुख्यधिकारी संतोष रोडे यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. कृषी क्षेत्राच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान अतुल्य आहे. कृषी क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानाची आठवण म्हणून 1 जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. कृषी विकासातील त्यांचे उल्लेखनीय योगदान आणि महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे जनक पान 3 वर








बीड :हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री कै वसंतराव नाईक यांची 112 वी जयंती वसंतराव नाईक पुतळा बीड येथे साजरी करण्यात आली त्याप्रसंगी अखिल भारतीय बंजारा क्रांती दल राष्ट्रीय महासचिव शरद भाऊ राठोड, पुर्णवादीचे बँक अद्यक्ष सुभाष जोशी जि प सभापती बाबुराव जाधव सावता परीषदचे कल्याण आखाडे भाजपा शहराध्यक्ष अशोक लोडा बंजारा क्रांती दल बीड जिल्हा अध्यक्ष भुषण भाऊ पवार वसंत राव नाईक अधिकारी कर्मचारी संगठन मराठवाडा अध्यक्ष बाबासाहेब चव्हाण अंकुश राठोड विलास राठोड परमेश्वर सावरकर प्रतीष्ठान अध्यक्ष अजिंक्य पांडवकॅप्टन जे डी चव्हाण,अर्जुन चव्हाण ,मयुरी ताई बांगर, नितीन जायभाय राजीव काळे बी जे राठोड आभय चव्हाण भाऊसाहेब राठोड़ ज्ञानेश्वर राठोड। अर्जुन राठोड प्रशांत वासनीक वीठ्ठल राठोड प्रीत कुकडेजा लता राऊत वंजारे सर। वैध सर तर पदाधिकारी तसेच सर्व समाज उपस्थित होते बांधवांना मार्गदर्शन केले

# शासकीय कापुस विक्रीसाठी शेतक-यांनी तयारी करावी- सभापती जयदत्त नरवडे



माजलगाव, प्रतिनिधी : - शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी शेतक-यांनी 2025 - 26 या हंगामाकरीता सर्व कागदपत्रांसह तयारी करावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

सन 2025 - 26 या कापूस हंगामाकरीता शासनाच्या हमीदराप्रमाणे सि. सी.आयच्या वतीने शासकीय कापुस खरेदी 8110 रूपये एवढा निश्चीत करण्यात आला आहे. शेतक-यांनी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी कापसाची ई - पिक पाहणी करणे आवश्यक आहे ,सात - बारावर कापसाची नोंद पान 3 वर